# विद्यावार्ता®

SPECIAL ISSUE-2020 08

Peer Reviewed International Refereed Research Journal







**शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम व**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**

यांच्या संयुक्त विद्यमाने

# ''राजर्षी शाहू, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान'' या विषयावर

# एक दिवसीय राष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद




प्राचार्य

डॉ.श्रीकृष्ण चंदनशिव



Scanned with CamScanner

21

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्य

डॉ. राम फाटक
इतिहास विभाग प्रमुख,
कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा जि.बीड

**प्रस्तावना :**

भारतात अतीशुद्र गणलेला समाज वरिष्ठ हिंदू समाजाच्या सामाजिक, धार्मिक आणि राजकीय गुलामगिरीच्या गर्तेत शतकानुशतके गंजत, गुजत, सडत पडला होता. समाजातील जातिव्यवस्थेमुळे सामाजिक विषमता शिगेस पोहचली होती. अशा या गलितगात्र झालेल्या अतिशुद्र समाजात आत्मविश्वास निर्माण करून माणूसकीचे जीवन जगण्याचा मार्ग दाखवून त्यांच्यात चैतन्य निर्माण करण्याचे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. आपल्या अस्पृश्य बांधवांना अत्याचार व गुलामगिरीतून मुक्त करण्याबरोबरच भारतीय घटनेनुसार त्यांना आर्थिक विकासाची संधी उपलब्ध करून देण्याचे अलौकिक कार्य त्यांनी केले. स्वत: उच्च विद्याविभूषित झाल्यावरही वैयक्तिक स्वार्थाच्या भूमिकेतून आर्थिक प्रलोभनाचा स्वीकार न करता त्यांनी आपले सर्व जीवन दलित बांधवांच्या उन्नतीसाठी समर्पित केले. सुप्रसिध्द चिरित्रकार धनंजय कीर त्यांच्या कार्याविषयी म्हणतात, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उदय हे आधुनिक भारताच्या इतिहासातील तेजस्वी आणि शाश्वत मुल्यांचे दर्शन घडविणारे एक महान पर्व आहे.' भारतीय घटनेचे शिल्पकार व कोट्यावधी दलितांच्या जीवनाचे उध्दारक म्हणून त्यांचे कार्य वेगळे व असामान्य आहे.

**जीवनचरित्र :—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म मध्य प्रदेशातील महू या गावी १४ एप्रिल १८९१ मध्ये



Scanned with CamScanner

झाला. रत्नागिरी जिल्ह्यातील आंबवडे हे त्यांचे मूळ गाव. वडील रामजी सैन्यात सुभेदार असल्याने शिक्षण व शिस्त लहानपणापासूनच अंगी बाणली होती. त्यांची आई भीमाबाई लहानपणीच वारल्याने त्यांच्या वडिलांनी त्यांचे पालन पोषण केले. सैन्यातून निवृत्त झाल्यानंतर त्यांना सातारा येथे दुसरी सरकारी नोकरी मिळाली, त्यामुळे बाबासाहेबांचे बालपण येथेच गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षण सातारा व मुंबई या ठिकाणी झाले. १९०७ मध्ये ते मॅट्रिक परिक्षा पास झाले. पुढील शिक्षणासाठी त्यांनी मुंबईच्या एलफिन्स्टन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला व १९१२ मध्ये ते इंग्रजी व पार्शियन विषय घेवून बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. बालविवाहाची प्रथा त्याकाळी रूढ असल्यामुळे वयाच्या चौदाव्या वर्षी त्यांचा विवाह रमाबाई नावाच्या मुलीबरोबर झाला. १९१३ मध्ये त्यांच्या वडिलांचे निधन झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना बडोधाचे नरेश सयाजीराव गायकवाड यांनी अमेरिकेतील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर केल्यामुळे कोलंबिया विद्यापीठात अर्थशास्त्र विषयात एम.ए. ची पदवी १९१५ मध्ये त्यांनी संपादन केली. १९१६ मध्ये कोलंबिया विद्यापीठातच पीएच.डी. साठी त्यांनी 'ब्रिटीश भारतातील प्रांतिक वित्तव्यवस्थेचा विकास' या विषयावर प्रबंध लिहिला. अमेरिकेतील अभ्यासक्रम पूर्ण करून आंबेडकर कायदा व अर्थशास्त्राच्या अभ्यासासाठी इंग्लंडला गेले. परंतु आर्थिक अडचणीमुळे शिक्षण अर्धवट सोडून ते भारतात परत आले व बडोदा संस्थानात नोकरी करू लागले. परंतु नोकरीमध्ये इतरांकडून अपमानास्पद वागणूक मिळाल्यामुळे मुंबईला परत आले व मुंबईच्या सिडनेहॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून (१९१९) काही काळ काम केले. नंतर राजर्षी शाहू महाराजांच्या बोटीने इंग्लंडला गेले. तेथे अपार श्रम घेवून एम.एस्सी. (अर्थशास्त्र) व डी.एस्सी. ह्या अर्थशास्त्रातील पदव्या मिळविल्या. याच वास्तव्यात ते बॅरिस्टरची परिक्षा (१९२३) पास होवून मायदेशी परतले.

**डॉ. आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्य :—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या सार्वजनिक जीवनाच्या प्रारंभापासून अस्पृश्य, दलित समाजात शिक्षणाचा प्रसार व प्रचार सुरू केला. दलितांना 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' हा संदेश त्यांनी दिला. शिक्षणामुळे दलितांची सामाजिक व धार्मिक गुलामगिरीतुन सुटका होण्यास मदत मिळणार होती. यासाठी त्यांनी प्राथमिक शिक्षण मोफत मिळाले पाहिजे व सक्तीचे झाले पाहिजे असा सरकारकडे आग्रह धरला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस दुबळा होवून अल्पायुषी होतो. तसेच शिक्षणाच्या अभावी निर्बुध्द राहिल्यास तो जिवंतपणी दुसऱ्यांचा गुलाम होतो.' थोडक्यात दलितांच्या सामाजिक दुखण्यावर शिक्षण हेच औषध आहे असे ते म्हणत. शिक्षण प्रसारासाठी त्यांनी पुढील कार्य केले.

**बहिष्कृत हितकारिणी सभा — १९२४ :—**

अस्पृश्य वर्गाची सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अस्पृश्यात शिक्षणाचा प्रसार आवश्यक वाटत होता. या वर्गाला शिक्षण मिळाल्यास आपल्या हक्काविषयी जागृत होवून हक्काच्या प्राप्तीसाठी संघर्ष करील असा त्यांचा विश्वास होता. अस्पृश्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी २० जुलै १९२४ मध्ये बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना करून त्यांनी संस्थात्मक कार्यास सुरूवात केली. या संस्थेच्या वतीने वाचनालये, प्रौढांसाठी रात्रीच्या शाळा सुरू करण्यात आल्या. या ठिकांणी दलित विद्यार्थ्यांकडे मानवतेच्या भूमिकेतून पाहणाऱ्या शिक्षकांचीच त्यांनी नेमणूक केली.

**भारतीय बहिष्कृत—शिक्षण प्रसारक मंडळ—१९२८:—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२४ मध्ये स्थापन केलेल्या बहिष्कृत हितकारणी सभेचे १९२८ मध्ये विसर्जन केले. त्याचबरोबर त्यांनी 'भारतीय बहिष्कृत—शिक्षण प्रसारक मंडळाची' १९२८ मध्ये स्थापना केली. अस्पृश्य वर्गात शैक्षणिक जाणीव निर्माण झाली पाहिजे असाच त्यांचा हेतू होता. या मंडळाच्या वतीने दोन विद्यार्थी वसतिगृहे सुरू केली. अस्पृश्य समाजातील मुलांची सोय व्हावी म्हणून छात्रालये उघडण्याचे कार्य हाती घेतले. एवढेच नव्हे तर आपल्या अनुयायांना प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी अस्पृश्य वर्गांना शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थी वसतिगृहाची स्थापना करून विद्यार्थ्यांच्या राहण्या—जेवणाची सोय करावी असा



Scanned with CamScanner

सल्ला दिला. सोलापूर, ठाणे व पनवेल इत्यादी ठिकाणी अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची स्थापना केली.

**पीपल्स एज्युकेशन सोसायटी —१९४६ :—**

डॉ. आंबेडकर १९२६ ते १९३६ या काळात विधिमंडळावर सदस्य म्हणून असताना अस्पृश्यांचे कल्याण, प्राथमिक शिक्षणातील दोष, अस्पृश्यांच्या शिक्षणाची सोय इत्यादीबाबत सरकारकडे मागण्या केल्या. अस्पृश्यांच्या शैक्षणिक क्रांतीस, उत्कर्षास त्यांच्यापासून प्रारंभ झाला. परंतु एवढ्यावर समाधान मानून ते थांबले नाहीत. दलित व बहुजानांच्या शिक्षणासाठी त्यांनी ८ जुलै १९४५ मध्ये 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी' या संस्थेची स्थापना केली. संबंध देशभर व विशेषत: मागासलेल्या वर्गात शिक्षणाचा प्रसार करणे हे या संस्थेचे ध्येय व उद्दिष्ट आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षण संस्थेच्या पवित्र कार्यास मदत करण्यासाठी अनेक दानशूर पुढे आले. या संस्थेच्या वतीने मुंबई येथे २० जून १९४६ मध्ये सिध्दार्थ कॉलेज सुरू केले. यासाठी सरकारकडून ३ लाख रूपयाचे अनुदान व तीन लाख रूपये कर्ज काढले. इंग्रजीबरोबर संस्कृत, पाली, अर्धमागधी, उर्दु, पर्शियन, फ्रेंच, जर्मन व मराठी भाषांचा तसेच विज्ञानाच्या सर्व शाखांचा अभ्यास सुरू केला.

मुंबई नंतर पुढे औरंगाबादच्या जनतेला शिक्षण सहज उपलब्ध व्हावे म्हणून १९ जून १९५० मध्ये औरंगाबाद येथे पी.इ.एस. कॉलेज याच संस्थेमार्फत सुरू केले. इमारतीच्या पायाभरणीचा कार्यक्रम डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते पार पडला. त्यावेळी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात 'हिंदू समाजाच्या अगदी खालच्या थरातल्या जमातीत माझा जन्म झाला असल्यामुळे शिक्षणाचे महत्व काय असते याची पुर्णपणे जाणीव मला आहे. त्यामुळे लहानपणापासून शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे असे माझे स्वप्न आहे. आज ते पुर्ण झालेले पाहण्यास मी हयात आहे याचा मला आनंद होत आहे.' पुढे १९५५ मध्ये याच औरंगाबादच्या कॉलेजचे नामांतर घडून ते मिलिंद कॉलेज असे झाले. डॉ. आंबेडकरांनी आयुष्याच्या अखेरच्या काळात पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या कार्यालाच वाहून घेतले. महाराष्ट्रासह, गुजरात, कर्नाटक येथे त्यांच्या संस्थेच्या काही शाखा आहेत. या शिक्षणसंस्थेतून शिक्षण घेतलेली माणसे देशाच्या कानाकोपऱ्यात पसरली आहेत.

**समारोप :—**

एक थोर अर्थतज्ञ, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कायदेपंडीत, राजकारण धुरंदर, निष्ठावंत समाजसेवक, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, प्रज्ञावंत लेखक, प्रभावी वक्ता म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ओळख आहे. विसाव्या शेतकातील महाराष्ट्रातील समाज सुधारणेच्या क्षेत्रात त्यांचे कार्य श्रेष्ठ मानले जाते. हजारो वर्ष अन्याय, अत्याचाराच्या गर्तेत पडलेल्या अस्पृश्य समाजाला वर काढण्याचे कार्य त्यांच्याइतके प्रभावी दुसऱ्या कोणत्याही समाजसुधारकाने केले नाही. अस्पृश्यांच्या सामाजिक व राजकीय हक्कांसाठी त्यांनी दिलेल्या लढ्याला भारताच्या इतिहासात तोड नाही. बहिष्कृत वर्गास 'शिका—संघटित व्हा—आणि संघर्ष करा' असा मूलमंत्र देवून या वर्गाच्या शैक्षणिक उन्नतीसाठी त्यांनी शैक्षणिक संस्थाची स्थापना केली. तसेच या समाजाला ताठ मानेने जगण्यास शिकविले. पुरूषप्रधान संस्कृतीच्या गुलामगिरीत अडकलेल्या स्त्रीवर्गाला मुक्त करण्यासाठी त्यांनी हिंदू कोड बिल संसदेत मांडले. भारतीय संविधानाच्या मौलिक कामगिरीबद्दल डॉ. आंबेडकर यांना उस्मानिया विद्यापीठाने क्ग्स्पजही सर्वोच्च पदवी देवून सन्मानीत केले. त्यांच्या कार्याविषयी डॉ. राजेंद्र प्रसाद म्हणतात, 'आंबेडकर आमच्या घटनेचे शिल्पकार आहेत आणि त्यांची अनेक क्षेत्रांतील सेवा आणि विशेषत: दलितांच्या उध्दारांकरिता केलेली सेवा फार महनीय आहे.' अशा या थोर महापुरूषाचे ६ डिसेंबर १९५६ रोजी दिल्ली येथे परिनिर्वाण झाले. भारत सरकारने त्यांच्या महापरिनिर्वाणनंतर १४ एप्रिल १९९१ मध्ये 'भारतरत्न' हा उच्च किताब त्यांना जाहिर केला. त्यांच्या धर्मपत्नी माईसाहेब, आंबेडकर यांनी डॉ. शंकरदयाळ शर्मा यांच्या हस्ते दिल्लीमध्ये तो पुरस्कार स्विकारला.

**संदर्भ :**

१. कीर धनंजय— डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई सन—१९८९

२. फडके भालचंद्र — डॉ. बाबासाहेब आंबेडकर



Scanned with CamScanner

३. कठारे, वाघमारे, पाटील— महाराष्ट्रातील आंबेडकर चळवळीचा इतिहास

४. डॉ. गव्हाणे, डॉ. शिंदे, डॉ. कुलकर्णी (देशमुख) — आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, अरूणा प्रकाशन, लातूर, प्रथम आवृत्ती— २ ऑक्टोबर २०१४

५. कांबळे बी.सी— समग्र आंबेडकर चरित्र, खंड दुसरा, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे, प्र.आर, १४ एप्रिल १९८५

६. यदुनाथ थत्ते— भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कौस्तुभ प्रकाशन, नागपूर, द्वितीय आवृत्ती, १५ ऑगस्ट १९४७

७. डॉ. भा.ल.भोळे— भारतीय राजकीय विचारवंत, पिंपळापुरे पब्लिकेशन, नागपूर, आवृत्ती २०१८

८. गायकवाड प्रदिप— डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची समग्र भाषणे, खंड७, क्षितिज पब्लिकेशन, नागपूर, द्वितीय आवृत्ती.२००७

९. प्रा. डॉ. एस.एस. गाठाळ — महाराष्ट्रातील समाजसुधारक, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, सन २०१७

१०. डॉ.किशोरकुमार गव्हाणे, डॉ. सुखदेव शिंदे— महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिकेशन, औरंगाबाद

□□□



Scanned with CamScanner